# १७.
# राष्ट्रीय कृषि विकास योजना

प्रशिक्षण माहिती पुस्तिका

## १७. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअतंर्गत पशुसंवर्धन विभागाच्या योजनांची माहिती

राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत पशुसंवर्धन विभागासाठी दिनांक ०७/११/२००८ च्या राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या सभेमध्ये चार योजनांना मंजुरी प्राप्त झालेली होती, परंतु दिनांक २७/१०/२०१० च्या राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या सभेमध्ये यामधील पोल्ट्री संदर्भातील २ योजना रद्द करण्यात येऊन, नविन १८ योजनांना मंजूरी देण्यात आली. त्यानंतर वर्ष २०११-१२ मध्ये दिनांक १६/०८/२०११ रोजी झालेल्या राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या सभेमध्ये पशुसंवर्धन विभागाच्या नविन १२ योजना मंजूर झाल्या. अशा रितीने राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या एकुण ३२ योजनांना मंजुरी प्राप्त असून सध्या योजनांची अंमलबजावणी सुरू आहे.

सन २००८-०९ पासून या योजनांना प्राप्त निधी व त्याअंतर्गत झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

**(रुपये कोटीत)**

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्पाचा एकुण मंजूर निधी | एकुण प्राप्त निधी | माहे डिसेंबर २०११ अखेर झालेला एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | शेतकऱ्यांच्या दारात कृत्रिम रेतन सुविधा पुरविणे | २०४.४० | ३५.५५ | ३५.५५ |
| २ | शेळी, मेंढी पैदास ग्राम योजना. | २०.०० | २.५० | २.५० |
| ३ | सघन कुक्कुट विकास गटाचे बळकटीकरण | १२.०० | १२.०० | १२.०० |
| ४ | लघु अंडी उबवणी यंत्राचा बचत गटांना पुरवठा | ३.३७ | ३.३७ | ३.३७ |
| ५ | मदर युनिटचे अमरावती जिल्ह्यात बळकटीकरण | ०.६२ | ०.६२ | ०.६२ |
| ६ | पशुवैद्यकिय संस्थांचे बळकटीकरण व आधुनिकिकरण | १४७.३६ | ३१.१५ | ३१.१५ |
| ७ | विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळांचे जीएलपी मानकांप्रमाणे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे तसेच आयएसओ प्रमाणकीकरण करणे. | ३.७४ | ३.७४ | ३.७४ |
| ८ | गोठीत रेत प्रयोगशाळा, खडकी पुणे-३ या संस्थेचे बळकटीकरण करणे | १.२० | १.२० | १.२० |
| ९ | गोठीत रेत प्रयोगशाळा, नागपूर ची स्थापना करणे. | ५.५५ | ३.५२ | ३.५२ |
| १० | कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेळ्या-मेंढ्यांकरिता बाजार स्थापन करणे | ७.५० | ३.७५ | ३.७५ |
| ११ | ॲनरोबिक ॲसिडीफिकेशन तंत्रज्ञानाचा उपयोग करून चारा-वैरण सकस बनविणे व जतन करणे तसेच अन्य वैरण स्त्रोतांचा उपयोग करणे. | ०.५९ | ०.५९ | ०.५९ |
| १२ | मुंबई उपनगर आणि लगतच्या क्षेत्रामध्ये उच्च अनुवंशिकतेच्या महिष नर वासरांचे संगोपन | ०.४० | ०.४० | ०.४० |
| १३ | सायटोजेनेटिक अन्वेषण प्रयोगशाळेची स्थापना | १.३० | १.३० | १.३० |
| १४ | क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकिय महाविद्यालय, शिरवळ जि. सातारा येथे टर्की संगोपन केंद्र स्थापन करणे. | ०.२७ | ०.२७ | ०.२७ |
| १५ | कृषि प्रक्षेत्र सुनेगाव, ता. अहमदपुर जि. लातूर येथे उदगिर पशुवैद्यकिय महाविद्यालयाव्दारे गवती करणांचा विकास करणे | ०.१० | ०.१० | ०.१० |
| १६ | पशुवैद्यकिय महाविद्यालय उदगिर येथील शल्य चिकीत्सा आणि रेडिओलॉजी विभागाचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करून क्षेत्रीय पशुवैद्यकांना प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे | २.८९ | २.८९ | २.८९ |
| १७ | पशुवैद्यकिय महाविद्यालय, परभणी येथील गवती करणांचा विक ास करणे | ०.१० | ०.१० | ०.१० |
| १८ | परभणी जिल्ह्यात सामुह्यहक तत्वावर महिष पालन व दुग्धोत्पादन व्यवसाय वाढीस लावून दुग्ध उत्पादनात वाढ करणे | ०.४२२९ | ०.४२२९ | ०.४२२९ |
| १९ | दुग्ध शास्त्र संस्था, आरे कॉलनी, मुंबई या संस्थेचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे आणि दुग्धव्यवसायिक व दुग्ध प्रक्रिया करणाऱ्यांना प्रशिक्षण देणे | ०.८३ | ०.८३ | ०.८३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड, पुसद चे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे आणि दुग्धव्यवसायिक व शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे | १.०३ | १.०३ | १.०३ |
| २१ | **पशुजन्य प्रथिने उत्पादनामध्ये वाढीसाठी राष्ट्रीय मोहीम**<br>अ. सघन शेळी उत्पादन कार्यक्रम<br>ब. पारंपारिक मुक्त चराई पध्दती अंतर्गत शेळयांच्या मांस उत्पादनामध्ये सुधारणा करणे | २.५० | २.५० | ०.०० |
| २२ | महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला अंतर्गत वळु माता प्रक्षेत्रांचे बळकटीकरण करणे | ७.९९ | ६.००१६ | ५.०० |
| २३ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लि. पुणे अंतर्गत प्रक्षेत्रातील शेळी-मेंढी प्रक्षेत्राचे बळकटीकरण करणे | ७.३३ | ३.६५ | १.०० |
| २४ | पशुजैव पदार्थ निर्मिती संस्थेतील विषाणूजन्य लस प्रयोगशाळेचे जीएमपी मानकानूसार बळकटीकरण व आधुनिकीकरण करणे | १०.०० | ५.०० | ०.०० |
| २५ | पशुजैव पदार्थ निर्मिती संस्थेतील जिवाणूजन्य लस प्रयोगशाळेचे जीएमपी मानकानूसार बळकटीकरण व आधुनिकीकरण करणे | ११.०० | ४.०० | १.०० |
| २६ | मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांचे बळकटीकरण | १.६५ | १.६५ | १.६५ |
| २७ | सायटोजेनेटिक प्रयोगशाळेची स्थापना | ०.४८ | ०.४८ | ०.४८ |
| २८ | लॅप्रोस्कोपीक (दुर्बिण) तंत्रज्ञानाव्दारे क्षेत्रिय पशुवैद्यकांच्या रोगनिदान करण्याच्या क्षमतेमध्ये सुधारणा करणे | २.९९ | २.९९ | २.९९ |
| २९ | मल्टीस्पेशालिटी व्हेटरिनरी हॉस्पिटलची स्थापना | ४.९९६१ | २.०० | २.०० |
| ३० | सामाजिक आर्थिक स्तर उंचावण्यासाठी गुणवत्तापूर्ण दूध उत्पादने तयार करणे | ०.६०२० | ०.६० | ०.६० |
| ३१ | सामाजिक आर्थिक स्तर उंचावण्यासाठी वराह पालन फार्म स्थापन करणे | ०.४५८४ | ०.३८८४ | ०.३८८४ |
| ३२ | शेळया-मेंढयांमध्ये त्वरीत रोग निदान करणे | १.९४ | ०.०० | ०.०० |
| | **एकुण** | **४६५.६०९४** | **१३४.५९२९** | **१२०.४४१३** |

## १. 'शेतकऱ्यांच्या दारात कृत्रिम रेतन सुविधा पुरविणे' –

या महत्वपूर्ण योजने अंतर्गत मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून, उर्वरित प्रत्येक जिल्ह्यात खाजगी पदवी/पदविकाधारक पशुवैद्यक, सहकारी/सेवाभावी/स्वंयसेवी/खाजगी संस्थांमार्फत कृत्रिम रेतनाच्या सेवा शेतकऱ्यांच्या दारापर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत, प्रति वर्षी ७.७० लाख कृत्रिम रेतनांचे उदिष्ट ठरविण्यात आले आहे.

या योजने अंतर्गत शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२००९/प्र.क्र.३२२/पदुम-४, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १२/८/२०१० अन्वये मे.जे. के. ट्रस्ट ठाणे या स्वंयसेवी/सेवाभावी संस्था मार्फत औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी व बीड, लातुर विभागातील लातुर, उस्मानाबाद, नांदेड व हिंगोली, नाशिक विभागातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नागपुर विभागातील नागपुर, वर्धा, भंडारा, गडचिरोली, चंद्रपुर व गोंदिया, अमरावती विभागातील अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला व वाशिम आणि मुंबई विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या २६ जिल्ह्यांमध्ये गाई म्हशींमध्ये शेतकऱ्यांच्या दारात कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

तसेच, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२००९/प्र.क्र.३२३/पदुम-४, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २३/४/२०१० अन्वये बेरोजगार पशुवैद्यक/पदविकाधारक यांच्यामार्फत शेतकऱ्यांच्या दारात कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सन २००८-०९ ते २०११-१२ या वित्तीय वर्षात रुपये ३५.५५ कोटी निधीचा विनियोग करण्यात आलेला आहे. मे. जे. के. ट्रस्ट, ठाणे या स्वंयसेवी संस्थेमार्फत माहे नोव्हेंबर-२०११ अखेर ९९५ कृत्रिम रेतन केंद्रे स्थापन करण्यात आली असून २,२८,८४८ कृत्रिम रेतने करण्यात आलेली आहेत.

**२. शेळी, मेंढी पैदास ग्राम योजना** -

राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता उर्वरित सर्व ३३ जिल्ह्यांमध्ये **'शेळी, मेंढी पैदास ग्राम'**योजना पण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ, पुणे-१६ यांचेमार्फत राबविण्यात येत आहे.

शेळी मेंढी पैदास ग्राम योजनेमध्ये स्थानिक शेळ्या मेंढ्याच्या मांस, दुध उत्पादनामध्ये अनुवांशिक सुधारणेद्वारे वाढ व्हावी यासाठी शेळी मेंढी पालकांना शुध्द जातीच्या नरांचे वाटप करण्यात येत आहे. योजनेची अंमलबजावणी वर्ष २०१०-११ व २०११-१२ या कालावधीमध्ये करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्प कालावधीत एकुण ३९,२०० नर वाटप करावयाचे असून प्रति नर (नग) रुपये ५०००/- (कमाल मर्यादेपर्यंत) या प्रमाणे रुपये १९६०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. प्रस्तुत योजना ही राज्यामध्ये प्रथमच राबविण्यांत येत असल्यामुळे या योजनेला दृकश्राव्य माध्यमे, वर्तमानपत्रे, चर्चासत्रे इत्यादी प्रसार व विस्तार माध्यमांमार्फत विस्तृत प्रसिध्दी देणे गरजेचे आहे. याकरिता रुपये ४०.०० लक्ष खर्च, राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्प कालावधीत उपलब्ध तरतूदीमधून खर्च करण्यात येत आहे.

शेळी व मेंढी विकास महामंडळास ही योजना राबविण्याकरिता लाभार्थ्यांकडून रुपये ५००/- प्रति नर सेवा शुल्क प्राप्त होईल. याप्रमाणे ३९,२०० नर वाटपास एकूण रुपये १९६.०० लक्ष इतका निधी महामंडळास मिळणे अपेक्षित आहे. त्यापैकी ५०% निधी महामंडळाच्या प्रक्षेत्रांवर माहिती तंत्रज्ञान विषयक आवश्यक सुधारणा करण्यासाठी निधीचा विनियोग करण्यात येणार आहे.

सदर खर्चाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

अ) माहिती तंत्रज्ञान विषयक सुधारणा

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १ | महामंडळाच्या सर्व प्रक्षेत्रांचे संगणकीकरण, विविध नोंदी ठेवण्याकरिता सॉफ्टवेअर तयार करणे इ. |
| २ | महामंडळाचे अधिकारी / कर्मचाऱ्यांना / प्रगतीशील शेतकऱ्यांना देशांतर्गत / देशाबाहेर प्रशिक्षण देणे |
| ३ | विस्तार कार्यातंर्गत माहिती पुस्तिका प्रकाशित करणे |

ब) शेळ्या मेंढ्यांचा जातीनिहाय जनुकीय अभ्यास

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १ | शेळ्या मेंढ्यांच्या जातीमधील जंत व रोगप्रतिकारक शक्ती इ. विषयक सर्वेक्षण |
| २ | प्रक्षेत्रावर आणि मेंढपाळांकडे वंशावळी व इतर नोंदी ठेवणेकरिता साहित्य पुरवठा. |
| ३ | नर पुरवठा करण्यापूर्वी नरमेंढे-बोकडांच्या रोगनिदानाकरिता चाचण्या घेणे. उदा. ब्रुसेल्ला, जोन्स रोग इ. |
| ४ | पुरवठा करण्यात येणाऱ्या नरमेंढे / बोकड यांची वाहतुक करणे. |

सन २०१०-११ ते २०११-१२ या वर्षात रुपये २.५० कोटी निधीचा विनियोग करण्यात आलेला आहे. आतापर्यंत सदर योजनेअंतर्गत १७८८ नर मेंढे व बोकड वाटप करण्यात आलेले आहेत .

**परसातील कुक्कुट पालनाचा विकास –**

राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या दिनांक २७.१०.२०१० रोजीच्या बैठकीमध्ये सन २०१०-११ या वर्षामध्ये कुक्कुट विकासाच्या खालील सुधारीत तीन योजना मंजूर झाल्या आहेत.

१. सघन कुक्कुट विकास गटाचे बळकटीकरण — रुपये १२.०० कोटी.
२. लघु अंडी उबवणी यंत्राचा बचत गटांना पुरवठा — रुपये ३.३७ कोटी
३. मदर युनिटचे अमरावती जिल्हयात बळकटीकरण — रुपये ०.६२ कोटी.

### ३. सघन कुक्कुट विकास गटाचे बळकटीकरण

राज्यातील ४ मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रे व १६ सघन कुक्कुट विकास गटांमध्ये (सोलापुर, सातारा, भिलवडी-जिल्हा सांगली, नाशिक, कोपरगाव-जिल्हा अहमदनगर, धुळे, यवतमाळ, अमरावती, पालघर-जिल्हा ठाणे, चिपळूण-जिल्हा रत्नागिरी, उस्मानाबाद, अर्धापुर-जिल्हा नांदेड, बीड व परभणी) आर आय आर, ब्लॅक ॲस्ट्रालॉर्प, तसेच केंद्रीय पक्षी अनुसंधान केंद्र, इज्जतनगर-बरेली यांची मान्यता प्राप्त असलेल्या गिरीराज, वनराज, कडकनाथ व कॅरी-निर्भिक इ. सुधारित देशी जातीच्या कुक्कुट पक्षांचे संगोपन केले जाते. या संस्थांमार्फत उबवणूकीची अंडी, एकदिवसीय पिल्ले, तलंगा व पैदाशीकरिता नर उपलब्ध करुन दिले जातात व याद्वारे ग्रामीण भागामध्ये परसातील कुक्कूटपालन करण्यास मोठया प्रमाणात सुविधांचा पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत परसातील कुक्कूटपालनासाठी गावठी कोंबडयांसारख्या दिसणाऱ्या परंतु जास्त अंडी व मांस उत्पादन करणाऱ्या सुधारीत जातीच्या देशी कोंबडयाची (केंद्रीय कुक्कुट अनुसंधान केंद्र, इज्जतनगर-बरेली यांची मान्यता प्राप्त असलेल्या जातींचे कुक्कुट पक्षी) मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. सदर मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील १६ सघन कुक्कूट विकास गटांवर आवश्यक त्या पायाभुत सोयी सुविधांची कमतरता आहे. त्यामुळे सघन कुक्कूट विकास गटाचे बळकटीकरण ही योजना राबविण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याव्दारे ग्रामीण भागामध्ये परसातील कुक्कूटपालनास मोठी चालना देऊन कुक्कूट पालकांसाठी पूरक उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देता येईल.

सघन कुक्कुट विकास गटांमध्ये प्रथम प्राधान्याने, अस्तित्वात असलेल्या कुक्कुट घरांची दुरुस्ती, सघन कुक्कुट विकास गटांची पायाभुत पक्षी संगोपन क्षमता वाढविण्याकरिता (किमान १००० पर्यंत) तसेच तलंगा गट संगोपना करिता (किमान ५०० पक्षी पर्यंत) कुक्कुट घरांचे नवीन बांधकाम करून त्यांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. या अंतर्गत अस्तित्वात असलेल्या कुक्कुट घरांची दुरुस्ती, सघन कुक्कुट विकास गटांची पायाभुत पक्षी संगोपन क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक बांधकामे करून तसेच वाढीव पक्षी संगोपनाकरिता आवश्यक साधन सामुग्री उपलब्ध करून त्यांचे बळकटीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेअंतर्गत प्रत्येक सघन कुक्कूट विकास गटाचे बळकटीकरणासाठी आवश्यक रु ७५.०० लाखांचा बाबवार खर्च खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| अ. | अस्तित्वात असलेल्या कुक्कुट घरांची दुरुस्ती | रुपये १५.०० लाख |
| ब. | सधन कुक्कुट विकास गटाची पायाभुत पक्षी ---- संगोपन क्षमता वाढविण्याकरिता (किमान १००० पर्यंत) तसेच तलंगा गट संगोपनाकरिता (किमान ५०० पक्षी पर्यंत) कुक्कुट घराचे नवीन बांधकाम | रुपये ३५.०० लाख |
| क. | पक्षी संगोपनाकरिता आवश्यक आवर्ती खर्च (खेळते भांडवल पायाभूत पक्षी, पिल्ले, खाद्य, औषधे व लस खरेदी, विस्तार कार्य, विद्युत देयके, डिजेल खरेदी इ.) | रुपये २०.०० लाख |
| ड. | आवश्यक साहित्य सामुग्री | रुपये ५.०० लाख |
| | **एकूण** | **रुपये ७५.०० लाख** |

वरीलपैकी सघन कुक्कुट विकास गटाचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ३.२० कोटीचा निधी खेळते भागभांडवल या करीता वितरीत करण्यात आला असून, सदरच्या निधीचा दिनांक ३१ मार्च २०११ पुर्वी विनियोग करण्यात आला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत पक्षीगृहाचे नवीन बांधकाम / जुन्या शेडची दुरुस्ती व आवश्यक साहित्य सामग्रीकरीता रुपये ८.८० कोटीचा निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीचा विनियोग माहे जुन-२०११ अखेर करण्यात आलेला आहे. जिल्हा परिषद स्तरावर बांधकाम प्रक्रिया सुरु आहे.

### ४. लघु अंडी उबवणी यंत्राचा बचत गटांना पुरवठा

राज्यातील १६ सघन कुक्कूट विकास गटांपैकी अमरावती वगळून उर्वरित १५ सघन कुक्कूट विकास गटांच्या कार्यक्षेत्रात एकूण २७४ लघू अंडी उबवणूक यंत्राचा पूरवठा करण्यास (प्रत्येकी १८ ते १९ यंत्रे × १५ सघन कुक्कूट विकास गट) व त्याप्रित्यर्थ ७५ टक्के अनुदानाचा खर्च रुपये ३३७.५० लाख वर्ष २०१०-११ व २०११-१२ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतुन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. संबंधित १५ सघन कुक्कूट विकास गटांच्या मार्फत, अंडी उबवणूक कार्यक्रमाचा आराखडा तयार करुन, सफल अंडयांचा तसेच लघू अंडी उबवणूक यंत्रांचा पुरवठा करण्यात येणार आहे.

यंत्रांद्वारे उबवणी केल्यानंतर निर्माण होणारी पिल्ले संबंधित बचत गट/कुक्कुट पालक लाभधारक, स्वतःकडे ठेऊन वाढवू शकतील किंवा इतर स्थानिक कुक्कूट पालकांना त्यांच्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार विक्री करु शकतील. मात्र बचत गट/कुक्कुटपालकांनी अंडी उबवणुकी संदर्भाने तसेच एकदिवसीय पिल्ले संगोपन करण्याच्या संदर्भाने होणारा संपुर्ण खर्च स्वतः सोसावयाचा आहे. सदरच्या लघु अंडी उबवणूक यंत्राद्वारे संबधित कुक्कुटपालकांकडे/ बचत गटांकडे स्थानिकरित्या निर्माण होणाऱ्या फलित अंडयांची देखील उबवणूक करुन घेता येईल.

अशा प्रकारची २७४ लघु अंडी उबवणूक यंत्रे राज्यात पुरविण्यासाठी एकूण रुपये ४५०.०० लाख खर्च अपेक्षित आहे. याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**योजनेचे आर्थिक निकष**

| अ.क्र. | तपशील | बाबनिहाय खर्च रुपये लाखात | अनुदानाची रक्कम व लाभार्थीचा हिस्सा |
|---|---|---|---|
| अ | हॅचर व सेटर (इनक्युबेटर)<br>इनर्व्हटर (४ टयुब्युलर बॅटरीसहीत)<br>२००० उबवणूकीची अंडी खरेदी | रुपये ०१.५४<br><br>रुपये ०.१० | |
| | एकूण | रुपये १.६४ | ७५ टक्के अनुदानाची रक्कम रुपये १,२३,००० व २५ टक्के लाभार्थी हिस्सा रुपये ४१०००. |
| ब | एकूण २७४ लघु अंडी उबवणी यंत्रे पुरवठा | रुपये ४५०.०० | ७५ टक्के अनुदानाची रक्कम रुपये ३३७.५० लाख व २५ टक्के लाभार्थी हिस्सा रुपये ११२.५ लाख |

सन २०११-१२ मध्ये रुपये ३.३७ कोटीचा निधीचा विनियोग करण्यात आलेला आहे.

**५. मदर युनिटचे अमरावती जिल्हयात बळकटीकरण –**

विदर्भातील अमरावती विभागातील सघन कुक्कूट विकास गट अमरावती यांचेमार्फत सन २०१०-११ व २०११-१२ या दोन वर्षांच्या कालावधीत अमरावती जिल्हा व नजिकच्या जिल्ह्यात प्रतिवर्ष २० मदर युनीटची स्थापना करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सदर मदर युनीटच्या मालकीच्या जागेवर ५०० चौ.फु. एवढया क्षेत्रफळाचे पक्षीगृह बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के परंतु रुपये १.०० लाखाच्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. तसेच वर्षभरातुन आठ बॅचेस मध्ये प्रत्येकी एक हजार याप्रमाणे एकूण ८००० एक दिवसीय पिल्ले ३५ टक्के अनुदानावर उपलब्ध करुन देण्यात यावीत. सदर ३५ टक्के अनुदानाची रक्कम व पिल्लांची उर्वरित लाभार्थी कडून प्राप्त होणारी रक्कम सघन कुक्कुट विकास गटांना देण्यात येणार आहे.

| **बाबनिहाय आवश्यक तरतूद** | |
|---|---|
| १. जागा | स्वतःच्या मालकीची |
| २. इमारत | |
| अ) ब्रुडर शेड, ५०० स्क्वे. फुट, प्रति स्क्वे. फुट रुपये २००/- प्रमाणे (योजनेच्या शासकीय अनुदानातुन होणारा खर्च) | रु. १,००,०००/- |
| ब) पाण्याची टाकी, पंप, गॅस ब्रुडर, खाद्य व पाण्याची भांडी इ. (बचतगट/कुक्कूटपालन यांनी करावयाचा खर्च) | रु. १,००,०००/- |
| **एकुण तरतूद** | रु. २,००,०००/- |
| आवर्ती खर्च (रनींग कॉस्ट) (१००० पिलांच्या संगोपनावरील खर्च) | |
| एक दिवसीय पिल्ले प्रति रु १३/- या प्रमाणे | रु. १३,०००/- |
| ४ आठवडे पर्यंत संगोपन करण्यासाठी खाद्य (अंदाजे १.२५ किलो खाद्य प्रति पक्षाकरीता. खाद्याचा दर रुपये १३/- प्रति किलो प्रमाणे म्हणजे रुपये १६.२५ प्रति पक्षाकरीता) | रु. १६,२५०/- |
| एकुण आवर्ती खर्च (रनींग कॉस्ट) | रु. २९,२५०/- |

सन २०११-१२ मध्ये रुपये ०.६२ कोटीचा निधीचा विनियोग करण्यात आलेला आहे.

### ६. पशुवैद्यकिय संस्थांचे बळकटीकरण व आधुनिकिकरण –

राज्यातील १७१ तालुकास्तरीय लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालये, ३१ जिल्हास्तरीय पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालये व १७२ तालुकास्तरीय पशुवैद्यकिय दवाखाने या संस्थांमध्ये प्रथम प्राधान्याने बिगरनिवासी बांधकामे करून तसेच त्यांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्याचे लक्षांकित आहे. तसेच पशुपालकांच्या पशुधनास पशुरोगांचे अचुक व लवकरात लवकर निदान होण्यासाठी व उत्तम पशुवैद्यकिय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी, पशुवैद्यकिय संस्थांना आवश्यक उपकरणे व यंत्रसामुग्रीची उपलब्धता करून येत आहे. त्या अनुषंगाने, आता या पशुवैद्यकिय संस्थाचे ठिकाणी बिगरनिवासी (दवाखाना इमारतींची) बांधकामे पशुवैद्यकिय संस्थानिहाय निर्धारित केलेल्या बिगरनिवासी (दवाखान्याची इमारत) मंजूर बांधकाम आराखडयानूसार अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळाचे निकष खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

१. तालुका पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-१ - ६६९.२६ चौ.मी.

२. तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय - ६६९.२६ चौ.मी.

३. जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय - १०६६.७० चौ.मी.

या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रु. १९.०० कोटीचा निधी पशुवैद्यकिय संस्थांना हत्यारे व उपकरणे खरेदी करीता वितरीत करण्यात आला असून सदरच्या निधीचा दि. ३१ मार्च २०११ पुर्वी विनियोग करण्यात आला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय व तालुका पशुवैद्यकिय चिकित्सालयाचे नविन बांधकाम व दुरूस्ती करण्यासाठी रु. १२.१५ कोटीचा निधीचा विनियोग करण्यात आलेला आहे. बांधकाम प्रक्रिया सुरु आहे.

### ७. विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळांचे जीएलपी मानकांप्रमाणे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे तसेच आयएसओ प्रमाणकीकरण करणे.-

या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये १.०० कोटीचा निधी विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा पुणे, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, अकोला व नाशिक यांना एकुण रुपये ०.८९ कोटी प्रयोगशाळांचे बांधकामासाठी व रुपये ०.११ कोटी निधी हत्यारे व उपकरणे खरेदी करीता वितरीत करण्यात आला असून, सदरच्या निधीचा दिनांक ३१ मार्च २०११ पूर्वी विनियोग करण्यात आला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये २.७४ कोटीचा वितरीत निधीचा विनियोग प्रयोगशाळाची दुरूस्ती व आधुनिकिकरण करण्यासाठी वितरीत करण्यात आलेला आहे.

### ८. गोठीत रेत प्रयोगशाळा, खडकी पुणे-३ या संस्थेचे बळकटीकरण करणे-

केंद्र शासनाच्या सी.एम.यु. पथकाने या प्रयोगशाळे मध्ये जैव सुरक्षाविषयक उपाययोजना तातडीने अंमलात आणण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. या अनुषंगाने, गोठीत रेत प्रयोगशाळा, खडकी पुणे-३ या संस्थेचे बळकटीकरण करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.८० कोटीचा निधी **गोठीत रेत प्रयोगशाळा, खडकी पुणे-३** या संस्थेस वितरीत करण्यात आला असून, संरक्षण भिंत, विर्य संकलन शेडचे विस्तारीकरण व स्टोअर रूमचे बांधकामाकरीता विनियोग करण्यात आलेला आहे.

सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ०.४० कोटीचा निधी वितरीत करण्यात आला आहे.

**कामाचे स्वरुप**

| | | |
|---|---|---|
| १. | जैवसुरक्षतेच्या दृष्टीने परिसराला संरक्षक भिंतींचे बांधकाम करणे. | रु. ६०.२२ लक्ष |
| २. | विर्य संकलन शेडचे विस्तारीकरण. | रु. १८.९३ लक्ष |
| ३. | विर्य संकलन शेडजवळ स्टोअर रुमचे बांधकाम | रु. ००.५४ लक्ष |
| ४. | पाण्याची टाकी पाईपलाईन व इलेक्ट्रीफिकेशन | रु. १५.०० लक्ष |
| ५. | पशुधनाच्या शेडचे नुतनीकरण व अनुशंगिक बांधकामे | रु. ०८.०० लक्ष |
| ६. | प्रयोगशाळेसाठी अत्यावश्यक साहित्य व उपकरणे | रु. १७.३१ लक्ष |

### ९. गोठीत रेत प्रयोगशाळा, नागपूर ची स्थापना करणे –

गोठीत रेत प्रयोगशाळा, नागपूर ही संस्था तेलंखेडी परिसरात कार्यरत आहे. प्रयोगशाळेची सध्याची जागा केंद्र शासनाच्या सी.एम.यु. निकषानूसार व शिफारशीनूसार जागा अपूरी असल्याने, गोठीत रेत प्रयोगशाळा, नागपूर ही संस्था वळु संगोपन केंद्र, नागपूर येथे स्थलांतरीत करून बांधकाम व मुलभत सेवा उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाअंतर्गत गोठीत रेत प्रयोगशाळा, नागपूर प्रस्थापना करण्याअंतर्गत खालीलप्रमाणे बांधकामे करण्याचे प्रस्तावित आहे.

| | **कामाचे स्वरुप** | **अंदाजित खर्च (रु. लक्ष)** |
|---|---|---|
| १. | संपुर्ण प्रयोगशाळा इमारतीचे बांधकाम | रुपये ११४.३४ |
| २. | इतर बांधकाम | रुपये १३१.२७ |
| ३. | संरक्षक भिंत बांधकाम | रुपये ८९.०० |
| ४. | आतील रस्ते बांधकाम | रुपये २३.७० |
| ५. | पाणी पुरवठा व घाणपाणी निचरा | रुपये २४.५६ |
| ६. | रेन वॉटर हार्वेस्टींग | रुपये ५.०० |
| ७. | अग्नीशमन | रुपये ५.०० |
| ८. | जमिन विकास (land development & scaping) | रुपये १५.०० |
| ९. | पाणी साठा व पाण्याचा स्त्रोत सुधारणेबाबत | रुपये २५.०० |
| १०. | सायकल/स्कुटर/गॅरेज बांधकाम | रुपये १०.०० |
| ११. | कॉन्टीन्जन्सीज | रुपये २२.१४ |
| १२. | विद्युतीकरण | रुपये २७.०२ |
| १३. | शितकरण | रुपये १०.०० |
| १४. | पथदिवे व ट्रान्सफॉर्मर | रुपये २०.०० |
| १५. | सेंटेज चार्जेस (बांधकाम) | रुपये २३.२५ |
| १६. | सेंटेज चार्जेस (विद्यूतीकरण) | रुपये ४.५६ |
| १७. | गुणनियंत्रण | रुपये ४.६५ |
| | **एकूण** | **रुपये ५५४.४९ लक्ष** |

सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ३.५२ कोटीचा निधी वितरीत करण्यात आला आहे. बांधकाम विभागाचे निविदा काढण्याचे काम पुर्ण झाले असून, बांधकाम प्रगतीपथावर आहे.

**१०. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेळया-मेंढ्यांकरिता बाजार स्थापन करणे –**

शेळया मेंढयांकरिता संगठित बाजाराची संकल्पना कार्यान्वित करण्यासाठी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत शेळया मेंढयांकरिता संगठित बाजार स्थापन करण्यात येणार आहेत. या योजने अंतर्गत बाजार समिती सोबत करावयाचा कराराचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे.

सदर योजने अंतर्गत रुपये ३.६५ कोटी निधी उपलब्ध झालेला आहे.

राज्यात भरणाऱ्या शेळया-मेंढ्यांच्या बाजारातील उलाढाल लक्षात घेता, जास्तीत जास्त उलाढाल असणाऱ्या खालील बाजारांच्या ठिकाणी या योजनेची अंमलबजावणी प्राधान्याने करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | ठिकाण | जिल्हा |
|---|---|---|
| १ | कळंब | उस्मानाबाद |
| २ | सांगोला | सोलापूर |
| ३ | चाळीसगांव | जळगांव |
| ४ | नेकनूर | बीड |
| ५ | लोणंद | सातारा |
| ६ | जत | सांगली |
| ७ | दोंडाइंचा | धूळे |
| ८ | खेड | पुणे |
| ९ | दर्यापुर | अमरावती |
| १० | लाखणी | भंडारा |

प्रत्येक बाजाराकरिता रुपये ७५.०० लाख, याप्रमाणे १० बाजार स्थापन करण्याकरिता एकूण रुपये ७५०.०० लक्ष निधी सन २०१०-२०११ व २०११-१२ मध्ये खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | तपशील | खर्च (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | जागा | कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीची |
| २ | शेळ्या/मेंढ्या करिता वाडे (१५००० चौ. फुट व २०० रु प्रती चौ. फुट) | ३०.०० |
| ३ | वृक्ष लागवड-एक हेक्टर जागेमध्ये (लागवड व तीन वर्षाकरिता देखभाल खर्च) | २.०० |
| ४ | संगणक व इंटरनेट सुविधा, प्रसिध्दी, प्रसार | ४.०० |
| ५ | पाणी पुरवठा (बोअरवेल, मोटारी, पाण्याच्या टाक्या, पाईप लाईन, पाण्याच्या कुंड्या इ.) | १०.०० |
| ६ | खाद्याची भांडी | १.०० |
| ७ | पशुवैद्यकिय मदत केंद्र व कार्यालयाचे बांधकाम ४०० चौ. फुट | ५.०० |
| ८ | चारा साठवण गृह (५००० चौ. फुट) | ५.०० |
| ९ | वजन काटे - २ नग | २.०० |
| १० | रॅम्प | ३.०० |
| ११ | कुंपण व प्रवेशद्वार | १०.०० |
| १२ | विद्युतीकरण | ३.०० |
| **एकूण** | | **७५.००** |

सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ३.७५ कोटीचा निधी वितरीत करण्यात आला आहे.

**११. ॲनरोबिक ॲसिडीफिकेशन तंत्रज्ञानाचा उपयोग करून चारा - वैरण सकस बनविणे व जतन करणे तसेच अन्य वैरण स्त्रोतांचा उपयोग करणे.-**

जनावरांना उपलब्ध होणाऱ्या चाऱ्याची कमतरता साधारणतः ३५ ते ४० टक्के आहे. तसेच उपलब्ध असणाऱ्या चाऱ्याची प्रतवारी देखील निकृष्ठ प्रकारची आहे. विशेषतः उन्हाळयामध्ये हिरव्या चाऱ्याची गंभीर टंचाई भासते. तरी चाऱ्याची योग्य ती उपलब्धता सुनिश्चित करणे, चाऱ्याची प्रत सुधारणे आणि हिरव्या चाऱ्याला पर्याय म्हणून इतर वेळी उपलब्ध असणाऱ्या अपांरपारीक स्त्रोतांवर जसे वाया जाणारा भाजी पाला, फळे इत्यादींवर काही प्रक्रिया करुन ते जनावरांस खाण्यायोग्य करणे तसेच त्याची टिकवण क्षमता वाढविण्यासाठी तंत्रज्ञान विकसीत करण्याची गरज आहे. मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई येथे सदर तंत्रज्ञान विकसीत करुन त्याचा विस्तार करण्यासाठीचा ॲनरोबिक ॲसिडीफिकेशन तंत्रज्ञानाचा उपयोग करून अपांरपारीक स्त्रोतांवर वाया जाणारा भाजी पाला,फळे इत्यादीवर प्रक्रिया करून ते खाण्यायोग्य करण्याचे तंत्र विकसीत करण्याचे पाच प्रात्यक्षिक केंद्राची स्थापना करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.२० कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, त्याचा पूर्ण विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ०.३९ कोटीचा निधी वितरीत करून विनियोग करण्यात आलेला आहे.

**१२. मुंबई उपनगर आणि लगतच्या क्षेत्रामध्ये उच्च अनुवंशिकतेच्या महिष नर वासरांचे संगोपन**

मुंबई पशुवैद्यकिय महाविद्यालय, मुंबई येथे, मुंबई व मुंबई उपनगर परिसरामधील उच्चअनुवांशिकतेच्या म्हैस जातींच्या वंशावळीचे जतन करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत उच्च अनुवंशिक क्षमता असणारी मुऱ्हा जातीची नर महिष वासरे तबेल्यांमधून प्राप्त करून व त्यांचे शास्त्रोक्त संगोपन करून महिष वळूंचा गोठित रेत मात्रा निर्मितीसाठी उपयोग करुन घेण्यात येणार आहे. वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.२५ कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ०.१५ कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

**१३. सायटोजेनेटिक अन्वेषण प्रयोगशाळेची स्थापना करणे रुपये १.३० कोटी मंजूर निधी**

मुंबई पशुवैद्यकिय महाविद्यालय, मुंबई येथे प्रयोगशाळा स्थापन करण्यात येत आहे. या प्रयोगशाळेमध्ये गोठित रेत मात्रांचे उत्पादनासाठी वापरात येणाऱ्या वळुचे कॅरिओ-टायपिंग तसेच इतर सायटोजेनेटिक चाचण्या करण्यात येणार आहेत. त्यामुळे अनुवंशिक रोगांना प्रतिबंध करणे शक्य होणार आहे. वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.९५ कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, त्याचा विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ०.३५ कोटीचा निधी वितरीत करून विनियोग करण्यात आलेला आहे.

**१४. क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकिय महाविद्यालय, शिरवळ जि. सातारा येथे टर्की संगोपन केंद्र स्थापन करणे.**

या योजने अंतर्गत क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ जि. सातारा येथे शेतकऱ्यांसाठी टर्की पालन प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे. टर्की फार्म स्थापन करणेसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, फार्मकरीता येणारा आवर्ती खर्च, प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्याकरीता आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करुन देणे, प्रयोगशाळेची उपकरणे या बाबींचा यामधे अंतर्भाव आहे. तसेच प्रशिक्षणासाठी येणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रोत्साहन भत्ता, प्रशिक्षणाचे साहित्य इत्यादी बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. प्रशिक्षणासाठी येणाऱ्या प्रशिक्षणार्थींना ३ दिवसांचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह देण्यात येणार आहे. प्रतिवर्ष १५० प्रशिक्षणार्थी याप्रमाणे प्रकल्प कालावधीत एकुण ३०० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.१७ कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये रुपये ०.१० कोटीचा निधी वितरीत करून त्याचा पूर्ण विनियोग करण्यात आलेला आहे.

**१५. कृषि प्रक्षेत्र सुनेगाव, ता. अहमदपुर जि. लातूर येथे गवती कुरणांचा विकास करणे.**

या योजने अंतर्गत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठा अंतर्गत पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, च्या अधिनस्थ कृषि प्रक्षेत्र, सुनेगांव, येथे चारा व कुरण क्षेत्र विकसित करणे प्रस्तावित आहे. शेतक-यांमध्ये जागृती निर्माण होऊन जास्तीत जास्त शेतकरी वैरण / गवतांच्या सुधारीत जातीची लागवड करण्यास उद्युक्त होतील. वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.१० कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, त्याचा पूर्ण विनियोग करण्यात आलेला आहे.

**१६. पशुवैद्यकिय महाविद्यालय उदगिर येथील शल्य चिकीत्सा आणि रेडिओलॉजी विभागाचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करून क्षेत्रीय पशुवैद्यकांना प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे**

पशुवैद्यकिय महाविद्यालय उदगिर येथील शल्य चिकीत्सा आणि रेडिओलॉजी विभागाचे बळकटीकरण व आधुनिकीकरण प्रस्तावित असून याअंतर्गत अद्ययावत पशु शल्यचिकीत्सेसाठी आवश्यक असलेली आधुनिक उपकरणे व यंत्रसामग्री उपलब्ध करुन देण्यात येईल. पशुशल्य चिकीत्सांची प्रात्यक्षिके पशुवैद्यकिय महाविद्यालयातील विद्यार्थी, क्षेत्रीय स्तरावर क काम करीत असलेले पशुवैद्यक आणि पशुपालकांना दाखविण्यात येतील. वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये १.६० कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये १.२९ कोटीचा निधी निधी वितरीत करून त्याचा पूर्ण विनियोग करण्यात आलेला आहे.

**१७. पशुवैद्यकिय महाविद्यालय, परभणी येथील गवती कुरणांचा विकास करणे-**

ही योजना पशुवैद्यकिय महाविद्यालय, परभणी यांचेद्वारे राबविण्यात येत आहे. विद्यापीठाच्या/शासनाच्या प्रक्षेत्रांवरील पडीक जमिनींचे गवती कुरणांमध्ये रुपांतर करण्यात येत आहे. वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.०५ कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ०.०५ कोटीचा निधी निधी वितरीत करून त्याचा पूर्ण विनियोग करण्यात आलेला आहे.

**१८. परभणी जिल्ह्यात सामुहीक तत्वावर महिष पालन व दुग्धोत्पादन व्यवसाय वाढीस लावून दुग्ध उत्पादनात वाढ करणे.**

महिषपालन व दुग्धोत्पादन व्यवसाय यशस्वी करण्यासाठी उत्तम व्यवस्थापन पध्दतींचे मार्गदर्शन, खाद्य व चारा इत्यादी बाबत मार्गदर्शन, तसेच स्वच्छ दुध निर्मितीबाबतचे प्रशिक्षण या प्रकल्पा अंतर्गत देण्यात येत आहे. वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.१५ कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ०.२७२९ कोटीचा निधी निधी वितरीत करून त्याचा पूर्ण विनियोग करण्यात आलेला आहे.

**१९.** दुग्ध शास्त्र संस्था, आरे कॉलनी, मुंबई या संस्थेचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे आणि दुग्धव्यवसायिक व दुग्ध प्रक्रिया करणाऱ्यांना प्रशिक्षण देणे .

**२०.** दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड, पुसद चे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे आणि दुग्धव्यवसायिक व शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे

उपरोक्त अनुक्रमांक १७ व १८ वरील योजनांचे अंतर्गत आवश्यक उपकरणे आणि पायाभुत सुविधा या प्रकल्पांतर्गत पुरविण्यात येत आहेत, जेणेकरुन प्रशिक्षण सुविधांमध्ये अमुलाग्र सुधारणा होऊन दूध उत्पादक व दूध प्रक्रिया करणा-या व्यवसायिकांना मोठा फायदा होईल. दुग्ध शास्त्र संस्था, आरे कॉलनी, मुंबई या संस्थेचे आधुनिकीकरण व बळकटी करण करणे आणि दुग्धव्यवसायिक व दुग्ध प्रक्रिया करणाऱ्यांना प्रशिक्षण देणे या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.६३ कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ०.२० कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड, पुसद चे आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे आणि दुग्धव्यवसायिक व शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ०.९० कोटीचा निधी वितरीत करण्यात आलेला असून, विनियोग करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत रुपये ०.१३ कोटीचा निधी निधी वितरीत करून त्याचा पूर्ण विनियोग करण्यात आलेला आहे.

**२१. पशुजन्य प्रथिने उत्पादनामध्ये वाढी साठी राष्ट्रीय मोहीम**

अ. सघन शेळी उत्पादन कार्यक्रम

ब. पांरपारीक मुक्त चराई पध्दती अंतर्गत शेळयांच्या मांस उत्पादनामध्ये सुधारणा करणे

केंद्र शासनाने प्रथिनयुक्त पशुजन्य उत्पादनांमध्ये भरीव वाढ करण्यासाठी राष्ट्रीय मोहिम (नॅशनल मिशन फॉर प्रोटीन सप्लिमेंटस्) राबविण्याचे निश्चित केले आहे. या मोहिमे अंतर्गत निवड केलेल्या १० राज्यांमध्ये (अ) शेळी पालनाद्वारे मांस उत्पादनात वाढ करणे आणि (ब) पारंपारिक शेळी पालन पध्दतीमध्ये शेळया/बोकड यांची मांस निर्मितीची क्षमता व त्या अन्वये उत्पादकता वाढविणे या योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने मार्गदर्शक तत्वे कळविलेली आहेत. केंद्र शासनाने या योजना राबविण्यासाठी निवडलेल्या दहा राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचाही समावेश आहे.

**(अ) शेळी पालनाद्वारे मांस उत्पादनात वाढ करणे:**

या योजनेची अंमलबजावणी बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद आणि लातुर या जिल्ह्यात करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांचीच निवड करुन त्यांना तीन महिने वयाच्या शेळीच्या करडांचे गट संगोपन करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर वाटप करण्यात यावेत. करडांच्या गटाचा आकार ४० (३८ मादी करडे आणि २ नर करडे) / ६० (५७ मादी करडे आणि ३ नर करडे) / ८० (७६ मादी करडे आणि ४ नर करडे) / १०० (९५ मादी करडे आणि ५ नर करडे) याप्रमाणे राहील. प्रत्येक मादी करडाची किंमत रुपये १२००/- तर पाच महिने वयाच्या नर करडाची किंमत रुपये १८००/- राहील. यानुसार वरील बाबी आणि त्याव्यतिरीक्त योजनेमध्ये लाभार्थींना द्यावयाच्या अन्य निविष्ठा व त्यांचे प्रित्यर्थ खर्चाची प्रमाणके यांचा तपशिल खाली दिल्यानुसार राहील.

| अ. क्र. | बाब | गटाचा आकार (३८ मादी करडे आणि २ नर करडे) | गटाचा आकार (५७ मादी करडे आणि ३ नर करडे) | गटाचा आकार (७६ मादी करडे आणि ४ नर करडे) | गटाचा आकार (९५ मादी करडे आणि ५ नर करडे) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ महिने वयाच्या मादी करडांची किंमत प्रत्येकी रुपये १२००/- प्रमाणे | रुपये ४५,६००/- | रुपये ६८,४००/- | रुपये ९१,२००/- | रुपये १,१४,०००/- |
| २ | ५ महिने वयाच्या नर करडांची किंमत प्रत्येकी रुपये १८००/- प्रमाणे | रुपये ३,६००/- | रुपये ५,४००/- | रुपये ७,२००/- | रुपये ९,०००/- |
| ३ | स्थानिक साहित्य वापरुन करडांसाठी शेडचे बांधकाम रुपये ५०/- प्रति स्क्वे. फुट दराने | (२४० स्क्वे. फुट) रुपये १२,०००/- | (३६० स्क्वे. फुट) रुपये १८,०००/- | (४८० स्क्वे. फुट) रुपये २४,०००/- | (६०० स्क्वे. फुट) रुपये ३०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | औषधे व लसी प्रत्येकी रुपये ७०/- प्रमाणे | रुपये २,८००/- | रुपये ४,२००/- | रुपये ५,६००/- | रुपये ७,०००/- |
| ५ | २ महिन्यासाठी खाद्य २५० ग्रॅम प्रतिदिन प्रति करडु रुपये १०/- प्रति किलोप्रमाणे (रुपये १५०/- प्रति करडु) | रुपये ६,०००/- | रुपये ९,०००/- | रुपये १२,०००/- | रुपये १५,०००/- |
| ६ | खाद्याची भांडी प्रत्येकी २० करडांसाठी १ व प्रति नग रुपये १,८००/- या दराने | (खाद्याची २ भांडी) रुपये ३,६००/- | (खाद्याची ३ भांडी) रुपये ५,४००/- | (खाद्याची ४ भांडी) रुपये ७,२००/- | (खाद्याची ५ भांडी) रुपये ९,०००/- |
| ७ | मुरघास खड्डा करण्यासाठी अनुदान रुपये ५०,०००/- | -- | रुपये ५०,०००/- | रुपये ५०,०००/- | रुपये ५०,०००/- |
| ८ | करडांचा विमा किंमतीच्या २ टक्के दराने | रुपये ९८४/- | रुपये १,४७६/- | रुपये १,९६८/- | रुपये २,४६०/- |
| ९ | वैरण उत्पादनासाठी वैरणीच्या बियाणांचा पुरवठा (सदर निविष्ठा अन्य मंजूर योजनेमधून पुरविण्यात येईल) | रुपये २,४००/- | रुपये ३,०००/- | रुपये ४,८००/- | रुपये ६,०००/- |
| | **एकुण** | **रुपये ७४,५८४/-** | **रुपये १,६१,८७६/-** | **रुपये १,९९,१६८/-** | **रुपये २,३६,४६०/-** |
| | | **रुपये ७५,०००/-** | **रुपये १,६२,०००/-** | **रुपये १,९९,०००/-** | **रुपये २,३६,०००/-** |

वरील तपशिलानुसार लाभार्थींना ४० / ६० / ८० / १०० करडांचे गट वाटप करण्यासाठी योजनेमध्ये १०० टक्के अनुदान अनुज्ञेय आहे.

या योजनेअंतर्गत भौतिक उद्दिष्ट व त्यानुसार आवश्यक तरतूदींचा तपशिल खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | गटाचा आकार | लाभार्थींची संख्या | तरतूद (रुपये लाखात) |
|---|---|---|---|
| **१** | ३८ मादी करडे आणि २ नर करडे | १०० | ७५.०० |
| **२** | ५७ मादी करडे आणि ३ नर करडे | १९ | ३०.७८ |
| **३** | ७६ मादी करडे आणि ४ नर करडे | ८ | १५.९२ |
| **४** | ९५ मादी करडे आणि ५ नर करडे | १२ | २८.३२ |
| | | **१३९** | **१५०.०२** |
| | | | **१५०.००** |

**(ब) पारंपारिक शेळी पालन पध्दतीमध्ये शेळया/बोकड यांची मांस निर्मितीची क्षमता व त्या अन्वये उत्पादकता वाढविणे**

या योजनेची अंमलबजावणी बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद आणि लातुर या जिल्ह्यात करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत वरील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी दोन क्लस्टर्स निवडण्यात येतील. प्रत्येक क्लस्टरमध्ये १० कि.मी. परिघातील आठ ते दहा गावांचा समावेश राहील. प्रत्येक क्लस्टरमध्ये समाविष्ट असलेल्या सदरच्या गावांमध्ये मिळून एकुण शेळया व बोकड यांची संख्या किमान २००० एवढी असणे आवश्यक राहील. अशा रितीने निवडलेल्या प्रत्येक क्लस्टरकरीता एक गोट स्काऊटची

(शेळ्या चारणारा / गुराखी) नियुक्ती करण्यात यावी. या गोट स्काऊट / गुराख्याने त्याला नेमून दिलेल्या क्लस्टरमधील आठ ते दहा गावांतील कमीतकमी २००० शेळ्यांची काळजी घेणे व शेळ्यांचे स्वास्थ्य रक्षण, शास्त्रीय पध्दतीने पैदास करण्यासाठी शेळीपालकांचे सातत्याने संपर्कात राहुन सदरची जबाबदारी पार पाडावी. गोट स्काऊट / गुराख्याने नेमून दिलेल्या क्लस्टरमधील गावांतील किमान १५० ते २०० शेळीपालक / शेळी पालन करणाऱ्या कुटुंबांची आणि त्यांचेकडील शेळ्यांच्या संख्येची नोंदणी करणे आवश्यक राहील. तसेच या सर्व शेळीपालकांकडील शेळ्यांना संतुलित शेळी खाद्य पुरवठा करणे (दोन महिने कालावधीसाठी), क्षेत्रिय गरजांनुसार विवक्षित घटकद्रव्ये असलेले क्षारमिश्रण पुरवठा करणे, जंतनाशक औषधे पाजणे, रोग प्रतिबंधक लसीकरण करणे आणि या शेळ्यांची शास्त्रीय पध्दतीने सुधारीत पैदास करणे ही कामे गोट स्काऊटने पुर्ण करावीत. यास्तव या गोट स्काऊटला दरमहा रुपये ३,०००/- प्रमाणे एकुण १८ महिन्यांच्या कालावधीसाठी मानधन देय राहील. अशा रितीने उपरोक्त १० जिल्ह्यातील २० क्लस्टर्स निवडून त्यांचेकरिता २० गोट स्काऊट नेमण्यात यावेत. या बाबींनुसार सदर योजनेखाली अनुज्ञेय खर्चाच्या बाबी आणि त्यांचे प्रित्यर्थ्य खर्चाची प्रमाणके यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | किंमत |
|---|---|---|
| १ | २ महिन्यांकरीता २००० शेळ्यांना संतुलित शेळी खाद्याचा पुरवठा करणे रुपये १०/- प्रति कि. ग्रॅ. प्रमाणे | रुपये ३,००,०००/- |
| २ | औषधे व लसी प्रत्येकी रुपये ७०/- प्रमाणे २००० शेळ्यांकरिता | रुपये १,४०,०००/- |
| ३ | गोट स्काऊट यांना प्रशिक्षण | रुपये ३,०००/- |
| ४ | १८ महिन्यांसाठी गोट स्काऊट यांना मानधन देणे रुपये ३,०००/- प्रतिमहा | रुपये ५४,०००/- |
| ५ | स्टेशनरी, नोंदवह्या, टॅगस्, प्रचार व प्रसिध्दी | रुपये ३,०००/- |
| | **एकुण** | **रुपये ५,००,०००/-** |

उपरोक्त तपशिलानुसार प्रत्येक क्लस्टरसाठी रुपये ५.०० लाख या मंजूर प्रमाणकानुसार बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद आणि लातुर जिल्ह्यांतील एकुण २० क्लस्टर्ससाठी रुपये १००.०० लाख एवढा खर्च अपेक्षित आहे.

## २२. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ अधिनस्त वळु माता प्रक्षेत्रांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाअंतर्गत ७ वळु माता प्रक्षेत्रे असून निधी व मनुष्यबळाच्या अभावी अपेक्षित उत्पादन व उच्च वंशावळीच्या नर वासरांची अपेक्षित संख्येने उपलब्धता होणेसाठी ,महाराष्ट्र पशुधन विकास मंडळा अंतर्गत वळु माता प्रक्षेत्र ताथवडे, कोपरगांव, हिंगोली व वडसा (गडचिरोली) या चार प्रक्षेत्रांची आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे प्रस्तावित आहे.

### योजनेची प्रमुख उद्दिष्टे

१. किफायतशीर गोठ्यांची निर्मिती करुन उत्पादकता वाढविणे.

२. शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

३. उच्च वंशावळीच्या नर वासरांची कृत्रिम रेतन व नैसर्गिक संयोगासाठी अपेक्षित संख्येची निर्मिती करुन दुध उत्पादनात भरीव वाढ करणे.

उपरोक्त प्रक्षेत्रांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी अंदाजपत्रके टर्न की बेसीसवर संबंधीत क्षेत्रातील तज्ञ संस्था/तंत्रज्ञ यांच्याकडुन तयार करुन घेण्यात येणार आहे. तसेच सल्लागाराची नियुक्ती टर्न की तत्वावर प्रकल्प कार्यानवित करण्यासाठी विहीत पध्दतीचा अवलंब करुन करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर योजनेखाली अनुज्ञेय खर्चाच्या बाबी आणि त्यांचे प्रित्यर्थ्य खर्चाची प्रमाणके यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | बाबनिहाय अपेक्षीत खर्च (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | प्रक्षेत्रांमध्ये चारा उत्पादनात वाढ करण्यासाठी सिंचनसुविधा निर्मिती व अनुवंशिक बाबी. | १०२.०० |
| २ | जुन्या गोठ्यांचे नुतनीकरण करणे इ. | ३३३.०० |
| ३ | चारा सुरक्षा व जैवसुरक्षेसाठी संरक्षक भिंती व कुंपण घालणे इ. | ८४.०० |
| ४ | नाविन्यपुर्ण व आधुनिक शेती साधने / यंत्राची उपलब्धता करुन घेणे | १२४.०० |
| ५ | मुरघास निर्मिती संबंधित बाबी | २४.०० |
| ६ | शेतकरी प्रशिक्षणाशी निगडीत बाबी | ८.०० |
| ७ | दुध काढण्याची यंत्रे, पार्लर, बल्क कुलर (शितकरण यंत्र), वजनकाटे इ. आधुनिक यंत्रसामुग्री प्रक्षेत्रासाठी प्राप्त करणे. | ८४.०० |
| ८ | आवर्ती आर्थिक तरतूद निधी उपलब्ध करुन आपतकालीन स्थितीचे व्यवस्थापनातून विकास करणे | ४०.०० |
| ९ | एकुण - | ७९९.०० |

**२३. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लि. पुणे अंतर्गत प्रक्षेत्रातील शेळी-मेंढी प्रक्षेत्राचे बळकटीकरण करणे. –**

महाराष्ट्र राज्यातील शेळी-मेंढीपालांच्या स्थानि शेळया-मेंढयांमध्ये अनुवांशिक सुधारणा करुन त्याद्वारे मांस व दूध उत्पादनात वाढ करणे, यासाठी सुधारित जातीचे मेंढेनर व बोकड वाटप करणे आणि त्याद्वारे शेळी-मेंढी पालकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे, तसेच कृषी संलग्नीत विकास क्षेत्राचा दर ६% पर्यंत वाढविणे ही या योजनेची उद्दीष्टे आहेत. यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत प्रक्षेत्राच्या सध्या असलेल्या क्षमतेच्या वृध्दीकरीता आणि शेळया-मेंढयांच्या सुधारित जातींचा विकास करण्यासाठी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या, मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, रांजणी, जि. सांगली, तिर्थ, //बु//, तुळजापूर, जि. उस्मानाबाद आणि पोहरा, जि. अमरावती या ०३ प्रक्षेत्रांचे बळकटीकरण करण्यासाठी व या योजनेंतर्गत येणारा खर्च रु. ७.३३ कोटी सन २०११-२०१२ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या निधीतून खालील बाबींवर खर्च प्रस्तावित आहे.

**(रु. लाखात)**

| अ. क्र. | बाब | मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, रांजणी, जि. सांगली | मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, तुळजापूर, जि. उस्मानाबाद | मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पोहरा, जि. अमरावती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पशुधन खरेदी | १८.८४ | ३१.४० | १२.५६ | ६२.८० |
| २ | नवीन वाडे बांधकाम | १६०.०० | १६०.०० | ८०.०० | ४००.०० |
| ३ | सिंचन सुविधा वाढविणे / विहीर बांधकाम / बोअरवेल / ठिंबक सिंचन / तुषार सिंचन / पाईपलाईन / इलेक्ट्रिक मोटार इ. अनुषंगीक बाबी. | ५१.५० | ५१.५० | ५१.२० | १५४.२० |
| ४ | कृषी अवजारे खरेदी, ट्रॅक्टर व ट्रॉली, चाफकटर इ. अनुषंगीक बाबी | २०.०० | २०.०० | २०.०० | ६०.०० |
| ५ | सायलोपीट बांधकाम | १२.०० | १२.०० | १२.०० | ३६.०० |
| ६ | भूविकास बांधबंदिस्त सपाटीकरण | - | १०.०० | १०.०० | २०.०० |
| | **एकूण** | **२६२.३४** | **२८४.९०** | **१८५.७६** | **७३३.००** |

**२४. पशुजैव पदार्थ निर्मिती संस्थातील विषाणूजन्य लस प्रयोगशाळेचे जी.एम.पी. मानकानूसार बळकटीकरण व आधुनिकिकरण करणे - रुपये १०.०० कोटी.**

**२५. पशुजैव पदार्थ निर्मिती संस्थातील जिवाणूजन्य लस प्रयोगशाळेचे जी.एम.पी. मानकानूसार बळकटीकरण व आधुनिकिकरण करणे - रुपये ११.०० कोटी.**

पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-७ ही पशु - पक्षांच्या रोगाविरुध्द लसींचे उत्पादन करणारी भारतातील अग्रगण्य संस्था आहे. या संस्थेमध्ये निर्माण होणा-या लसी, सर्व राज्यस्तरीय आणि स्थानिकस्तरीय पशुवैद्यकीय संस्थेमार्फत राज्यातील प्राणी व कुक्कुट वर्गीय पक्षांना विनामूल्य उपलब्ध करुन दिल्या जातात. राज्यातील व्यापारी तत्वावरील कुक्कुट पालन संस्था व त्याचप्रमाणे इतर राज्ये आणि सैनिकी प्रक्षेत्रे यांनाही त्यांच्या मागणीप्रमाणे व उपलब्धतेनुसार लसींचा पुरवठा रोखीने केला जातो.

अन्न व औषध प्रशासन विभागाने लस निर्मितीच्या प्रकल्पात आदर्श उत्पादन पध्दतीचा (जीएमपी) अवलंब करणे अनिवार्य केले आहे आणि तसे न केल्यामुळे त्यांनी सदर संस्थेतील लस निर्मिती बंद करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेचे आदर्श उत्पादन (जीएमपी) पध्दतीचा अवलंब करुन बळकटीकरण व आधुनिकीकरण करणे व राज्यातील वाढीव मागणी लक्षात घेवून उत्पादित होणा-या लसीची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने, औषधे व सौंदर्य प्रसाधन कायदा १९४० च्या शेडयूल ' एम ' अन्वये आदर्श उत्पादन पध्दती (जीएमपी) चा अवलंब करुन पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेचे आधूनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी, अन्न व औषधी प्रशासन विभागाने लस निर्मितीच्या प्रकल्पात आदर्श उत्पादन पध्दतीचा (जीएमपी) अवलंब करणे अनिवार्य केले आहे आणि तसे न केल्यामुळे त्यांनी संस्थेतील लस निर्मिती बंद करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेचे आदर्श उत्पादन पध्दतीचा अवलंब करुन बळकटीकरण व आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. तसेच राज्यातील वाढीव मागणी लक्षात घेवून उत्पादित होणा-या लसीची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करण्यासाठी नवीन विषाणू व कुक्कुट लस प्रयोगशाळा उभारणी करणेसाठी प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

**बाबनिहाय अपेक्षित खर्चाचा तपशील खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.**

| **अ.क्र.** | **तपशील** | **बाबनिहाय अपेक्षित खर्च** (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | **विषाणू लस** निर्मिती प्रयोगशाळेचे आदर्श उत्पादन पध्दतीनुसार संपूर्ण टर्न की पध्दतीने नवीन इमारतीचे बांधकाम, अनुषंगिक यंत्रसामुग्री व साधन सामुग्रीसह. | १०.०० |
| २. | **कुक्कुट लस** निर्मिती प्रयोगशाळेचे आदर्श उत्पादन पध्दतीनुसार संपूर्ण टर्न की पध्दतीने नवीन इमारतीचे बांधकाम, अनुषंगिक यंत्रसामुग्री व साधन सामुग्रीसह. | ११.०० |
| | **एकूण** | **२१.००** |

**२६.मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्राचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करणे.**

राज्यात पुणे, कोल्हापुर, औरंगाबाद व नागपुर या ठिकाणी मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रे स्थापन केलेली आहेत. चारही केंद्रात ऱ्होड आयलॅंड रेड, जातीचे पक्षांचे संगोपन व संवर्धन व पैदास केली जाते. या जातीबरोबर ब्लॅक ॲस्ट्रॉलार्प आणि व्हाईट लेग हॉर्न जातीचे पक्षी संगोपन करुन आपापसामध्ये संकरीकरण करुन अस्ट्राव्हाईट व ऱ्होडो व्हाईट जातीची पैदास केली जाते. तसेच मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमध्ये सन २००५-०६ या वर्षापासुन, परसातील कुक्कुट पालनासाठी, ग्रामीण भागातील कुक्कुटपालनास अधिक चालना देण्यासाठी गिरीराज, वनराज व कडकनाथ या जातीच्या संगोपन व संवर्धनासाठी जोपासना करुन उबवणी केंद्रात निर्मित पिलांचा पुरवठा मागणीनुसार करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील चार मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रे, पुणे , कोल्हापुर, औरंगाबाद व नागपुर यांना स्वयंचलित खाद्य व पाणी पुरवठा करण्यासाठी यंत्रणा खरेदी करणे व सदरची यंत्रणा बसविण्यासाठी लागणारा अनुषंगीक खर्च करणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रस्तावित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्राचे नांव | एकुण किंमत (रुपये लाख) | अंमलबजावणी अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, पुणे | रुपये ३५.०० | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जि. पुणे |
| २ | मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, कोल्हापुर | रुपये ४४.०० | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जि. कोल्हापुर |
| ३ | मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, औरंगाबाद | रुपये ४२.०० | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जि. औरंगाबाद |
| ४ | मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, नागपुर | रुपये ४४.०० | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जि. नागपूर |
| | एकुण | रुपये १६५.०० | |

**वरील योजनांव्यतिरिक्त पशुसंवर्धन विभागाच्या खालील योजनांचा समावेश राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत करण्यात आला आहे.**

२७. सायटोजेनेटिक प्रयोगशाळेची स्थापना - रुपये ०.४८ कोटी

२८. लॅप्रोस्कोपीक (दुर्बिणव्दारे) तंत्रज्ञाव्दारे क्षेत्रिय पशुवैद्यकाच्या रोग निदान करण्याच्या क्षमतेमध्ये सुधारणा करणे – रुपये २.९८९२ कोटी

२९. मल्टीस्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पीटलची स्थापना – रुपये ४.९९६१

३०. सामाजिक आर्थिक स्तर उंचावण्यासाठी दूध गुणवत्तापूर्ण उत्पादने करणे – रुपये ०.६०२०

३१. सामाजिक आर्थिक स्तर उंचावण्यासाठी वराह पालना फॉर्म स्थापन कर - रुपये ०.४५८४

३२. शेळया-मेंढयामध्ये त्वरीत रोग निदान करणे – रुपये १.९३ कोटी

♦♦♦